# कोल्हापूर जिल्हा प्राध्यापकांची सह. पत संस्था मर्या; कोल्हापूर.

## नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, सन २०१५-२०१६ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १४।८।२०१६ इ. रोजी दुपारी ठीक २.०० वा. १७३५, सी, सुटा ऑफीस, कोल्हापूर येथे खालील विषयांवर विचार करण्याकरिता भरविण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

### ● सभेपुढील विषय ●

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१।३।२०१६ इ. रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल, तेरीज, ताळेबंद, नफातोटा पत्रके वाचून मंजूर करणे.

३) व्यवस्थापन समितीने शिफारस केलेल्या नफा-विभागणीस मंजुरी देणे.

४) सन २०१५-२०१६ सालात जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०१६-१७ करिता व्यवस्थापन समितीने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

५) संस्था शासकीय लेखापरीक्षण अहवाल वर्ष २०१५-१६ ची नोंद घेणे.

६) सहकार खात्यास पाठविलेल्या शासकीय लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवाल सन २०१४-१५ ची नोंद घेणे.

७) सन २०१६-१७ करिता अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८) सन २०१६-१७ करिता वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.

९) संचालकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१०) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांची चर्चा करणे.

व्यवस्थापन समितीच्या ठरावावरून दि. २९-०७-२०१६

**प्रा. आर . बी. चोपडे**
मानद सचिव

**प्रा. जी. एच. आळतेकर**
अध्यक्ष

### ● सभासदांना विनंती ●

१) सर्व सभासदांनी सभेस येताना अहवाल बरोबर आणावा.

२) सभेच्या ठरलेल्या वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत कोरम न झालेस सभा तहकूब केली जाईल. अशी सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल. तहकूब होऊन नंतर झालेल्या सभेस कोरमचे बंधन राहणार नाही.

३) अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यासंबंधीची माहिती ऑफीस वेळेत मिळू शकेल. त्याबाबत काही सूचना, प्रश्न मांडावयाचे असलेस ते दि. १२।८। २०१६ अखेर ऑफीस वेळेत लेखी पाठविण्यात यावेत.